# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
(शिक्षण विभाग)

क्र. 2066/शि.वि. दि. 2/07/2014

## स्मरण पत्र

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ / उच्च प्राथ. / माध्यमिक शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

विषय :– **विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबंधीच्या स्कुलबस धोरणानुसार शाळेत स्कुलबस सुरक्षितता समितीचे गठन करण्याबाबत.**

संदर्भ :– 1) मा. आयुक्त, नागपूर शहर पोलिस यांचे दि. 12 / 06 / 2014 चा जिल्हा स्कूलबस सुरक्षितता समितीच्या सभेतील निर्देशानुसार
2) कार्यालयीन पत्र क्र. 1870 / शि.वि. दि. 08.05.2014
3) उपायुक्त, तथा परीवहन व्यवस्थापक, परीवहन विभाग, म.न.पा., नागपूर यांचे पत्र क्र. परीवहन / 1415 / 2014 दि. 06 / 05 / 2014
4)उपप्रादेशिक परीवहन अधिकारी, नागपूर (ग्रामीण) यांचे पत्र क्र. आस्था / प्रापका / नाग / ग्रा / 4616 / 2014 दि. 19.04.2014.
5) शासन अधिसूचना क्र. एमव्हीआर– 0808 / प्र.क्र.153 / परि–2 / दि.22.03.2011.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 2 नुसार आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसंबंधीच्या स्कुलबस धोरणानुसार शाळेत स्कुलबस सुरक्षितता समितीचे गठन करण्याबाबत आपणांस सुचित करण्यात आले होते. मा. आयुक्त, नागपूर शहर पोलिस यांचे दि. 12 / 06 / 2014 चा जिल्हा स्कूलबस सुरक्षितता समितीच्या सभेतील निर्देशानुसार त्वरीत संपूर्ण शाळांमध्ये या समितीचे गठन करणे अनिवार्य आहे. या समितीचे गठन आपल्या शाळेत करून तसा अहवाल शाळा निरीक्षक मार्फत त्वरीत सादर करावयाचा आहे. या समितीची प्रत्येक तीन महिन्यातून किमान एक बैठक घेणे अनिवार्य आहे.या शालेय परीवहन समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

1) अध्यक्ष – मुख्याध्यापक / प्राचार्य
2) सदस्य सचिव – पालक संघाचा प्रतिनिधी
3) सदस्य – अ) पोलिस विभागाचा प्रतिनिधी
ब) प्रादेशिक परीवहन विभागाचा मोटार वाहन निरीक्षक
क) बस कंत्राटदाराचा प्रतिनिधी
ड) स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रतिनिधी.

वरीलप्रमाणे आपल्या शाळेत शालेय परिवहन समितीचे गठन करून त्यांची नियमित सभा घ्यावी व शासकीय अधिसुचना क्र. एमव्हीआर– 0808 / प्र.क्र.153 / परि–2 / दि.22.03.2011 अन्वये कार्यवाही करावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

प्रतिलिपी :–
1) मा. अपर आयुक्त, म.न.पा. नागपूर.
2) मा. उपायुक्त, म.न.पा. नागपूर
3) मा.उपायुक्त, तथा परीवहन व्यवस्थापक, परीवहन विभाग, म.न.पा., नागपूर